ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधान: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53

वर्ष २७ | पुणें, बुधवार तारीख १ मार्च, १९६१ | अंक ५

## विविध माहिती

**कावेरीच्या खोऱ्यांत तेलाचा शोध**—कावेरी नदीच्या खोऱ्यांत तेलाचा शोध करण्याच्या प्रयत्नांना कांहीं प्रमाणांत यश आल्याची वार्ता आहे. ह्या भागांतील तेल शोधण्याची कामगिरी करण्याची तयारी एका अमेरिकन कंपनीनें दाखविली आहे. तेल सांपडल्यास त्यावरील फायद्यांत सरकारला ५० टक्के वांटा देण्याची तयारी कंपनीनें दाखविली आहे. भारत सरकार ६० टक्क्यांची मागणी करीत आहे.

**रस्त्यांवरील मोटारींची वाहतूक**—अलीकडे निरनिराळ्या राज्यांतील राष्ट्रीयीकरण झालेल्या मोटार-वाहतूक संघटना लांब पल्ल्यापर्यंत जाणाऱ्या मोटारी सोडत आहेत. त्यामुळें रेल्वे- वाहतुकीवर होणाऱ्या परिणामाचा विचार करण्यांत येत नाहीं. येत्या १०-१५ वर्षांत वाहातुकीचें प्रमाण वाढणार असलें, तरी वरील स्पर्धेमुळें नवे प्रश्न उभे राहतील असा इशारा नियोगी समितीनें दिला आहे.

**चीनमधील दुष्काळाचें एक कारण?**—चीनमधील दुष्काळाच्या कारणांत नैसर्गिक आपत्तींचा हात असला तरी कांहीं लोक आणखी एक वेगळेंच कारण देत आहेत. चीननें धान्यावर ताव मारणाऱ्या चिमण्यांचा फडशा पाडला. त्यामुळें चिमण्यांचें भक्ष्य असलेल्या शेतांतील किड्यांना चांगलेंच फावलें व त्यांनीं धान्याचा स्वाहाकार केला, असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

**सहकारी साखर कारखान्यांचें चर्चासत्र**— महाराष्ट्र राज्याच्या सहकारी साखर कारखान्यांच्या संघानें एक चर्चासत्र घडवून आणण्याचें ठरविलें आहे. सहकारी साखर कारखान्यांपुढें असणाऱ्या अनेक प्रश्नांचा सत्रांत विचार करण्यांत येणार आहे. सहकारी साखर कारखान्यांत काम करणारे तंत्रज्ञ ह्या चर्चासत्रांत भाग घेणार आहेत.

**अमेरिकेचें सिलोनला कर्ज**—अमेरिकेच्या विकासनिधींतून सीलोनला ३२ लाख डॉलर्सचें कर्ज मिळणार आहे. कोलंबोपासून २४ मैलांवर एक आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्यासाठी कर्जाचा उपयोग केला जाणार आहे. कर्जाच्या कराराच्या अटीप्रमाणें ह्या कामासाठी लागणारें सामानसुमान अमेरिकेंत खरेदी करावयाचें आहे.

**कागदासाठी लागणारा लगदा**—कागद व कार्डबोर्ड ह्यांना लागणारा लगदा तयार करण्याची एक पद्धत सीलोनमधील शास्त्रज्ञानें शोधून काढली आहे. ह्या पद्धतीमुळें कच्च्या मालाचें संस्करण ४ तासांऐवजीं ३० मिनिटांत होईल, बाष्पशक्तीच्या उपयोगांत ५० टक्के बचत होईल आणि रसायनांच्या वापरांत २० टक्के बचत होईल असा त्यांचा दावा आहे.

**हातमागाबद्दलच्या धोरणांत विसंगति**—गुजरातमधील हातमाग सप्ताहानिमित्त भरविण्यांत आलेल्या प्रदर्शनांत भाषण करतांना गुजरातच्या मुख्य मंत्र्यांनीं हातमागाच्या कापडाच्या वापराला उत्तेजन देण्याविषयीं सुचविलें. पण त्यांच्या पत्नीनें, एका सरकारी पत्रकांत हातमागाचें कापड सरकारी बंगल्यांत फक्त पडद्यासाठींच वापरावें अशी सूचना देण्यांत आल्याचें तेथेंच सांगितलें.

**विदर्भांतील नवें धरण**—विदर्भांतील भंडारा जिल्ह्यांत बाघ नदीवर बांधण्यांत यावयाच्या धरणाचा पायाभरणी समारंभ करण्यांत आला. ह्या धरणाला ६ कोटी रुपये खर्च येणार आहे. धरणाची लांबी ३,४५० फूट व उंची ७५ फूट असेल. धरणांतील पाण्याखालीं ६०,००० एकर जमीन भिजूं शकेल. ह्या कामासाठी मध्यप्रदेशच्या पूर्वींच्या सरकारनें मंजूर केलेली रक्कम अपुरी होती.

**पाकिस्तानच्या विद्युत्-केंद्राचा विस्तार**—जर्मनींतील प्रसिद्ध ए. इ. जी ह्या कंपनीनें पाकिस्तानच्या मुलतान येथील विद्युत्-निर्मिती केंद्राचा विस्तार करण्याचें काम घेतलें आहे. हें केंद्र मुलतान येथें आहे. ह्याच कंपनीनें तें बांधलेले आहे. विस्ताराचें काम पूर्ण झाल्यावर केंद्र २,६५,००० किलोवॅट वीज निर्माण करूं शकेल.

**कमाल जमीनधारणा बिल**—महाराष्ट्र राज्य सरकारनें जमीनधारणाबाबत आणलेल्या नव्या बिलांतून खाजगी साखर कारखान्यांना वगळावें अशी मागणी करण्याकरतां गोदावरी शुगर-मिल्सचें एक शिष्टमंडळ कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. रेड्डी ह्यांना भेटलें. साखर कारखान्यांना ऊंस पुरविला जाण्याची हमी देण्याच्या कलमाबाबत खाजगी कारखानदारांचें समाधान झालेलें नाहीं.

**मोटार वाहतुकीचे नवे मार्ग**—विदर्भांतील प्रॉव्हिन्शिअल ट्रॅन्सपोर्ट सर्व्हिस महाराष्ट्र राज्याच्या स्टेट ट्रॅन्सपोर्टमध्यें विलीन करण्यांत येणार आहे. त्यानंतर ता. १ एप्रिलपासून विदर्भामधील ३१ नव्या मार्गावर मोटारींची वाहतूक सुरू करण्यांत येईल. त्यामुळें ९२ खाजगी वाहतूक कंपन्या बंद होतील. नव्यानें सुरू होणाऱ्या मार्गांची लांबी १,५०० मैल आहे.

**चांदा जिल्ह्यांत लोखंडाचा कारखाना**—चांदा जिल्ह्यांत बिडाचें लोखंड तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठीं १५ कोटी रुपये भांडवल लागेल. भारतामधील एका कंपनीकडे हें काम सोंपविण्यांत आलें आहे. कंपनीला पूर्व जर्मनींतील तज्ज्ञ मदत करणार आहेत. चांदा जिल्ह्यांत सांपडणाऱ्या लोखंडाच्या खनिजांत ७० ते ८० टक्के लोखंडाचा अंश आहे.

**छोट्या मोटारगाडीचें उत्पादन**—भारतामधील परिस्थितीला जुळणारी व जिची किंमत ५ ते ६ हजारांपेक्षा अधिक असणार नाहीं अशी मोटारगाडी तयार करण्याचा विचार करण्यासाठी भारत सरकारनें नेमलेल्या पांडे कमिटीपुढें दोन–तीन परदेशी कंपन्यांच्या योजना आल्या आहेत. त्यांत एका इटालिअन कंपनीची एक योजना आहे. इटालिअन कंपनी 'फिआट ६०० ' ही गाडी तयार करूं इच्छित आहे.

**राजकोट येथें शेतकी कॉलेज**—सौराष्ट्रांत राजकोट येथें एक शेतकी कॉलेज काढण्याचें घाटत आहे. महाराजा कृष्णाकुमारसिंहजी ट्रस्टतर्फे कॉलेज काढण्यासाठी मोठी देणगी मिळण्याचा संभव आहे. ट्रस्टच्या वतीनें राजकोटमध्यें शेतीची शाळा काढण्यासाठी २ लाख रुपयांची देणगी मिळणार होती. पण आतां शाळेऐवजीं संपूर्ण अभ्यासक्रमाचें कॉलेजच काढण्याचा विचार ट्रस्ट करीत आहे.

**ह्या कचऱ्याचें काय करावें?**—जर्मनीमधील लोकांचें राहणीचें मान वाढल्यामुळें मोठ्या शहरांतून पदार्थांना गुंडाळण्यांत येणाऱ्या वेष्टनांचे कागद व इतर वेष्टनें फार मोठ्या प्रमाणावर कचरा पेटींत टाकण्यांत येतात. हा कचरा जाळण्याचा मार्ग हॅम्बुर्ग नगरपालिकेनें स्वीकारला आहे, तर डुइसबर्ग नगरपालिकेनें कचऱ्याचें खत करण्याचा मार्ग स्वीकारला आहे. डुइसबर्ग नगरपालिका कचऱ्यांच्या ढिगांवर सुवासिक द्रव्यांचे फवारे मारते. त्यामुळें दुर्गंधीपासून नागरिकांचा बचाव होतो.

**गुजरात राज्यांतील विजेचा पुरवठा**—तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस गुजरात राज्यांतील विजेच्या पुरवठ्यांत दुपटीनें वाढ करण्यांत येणार आहे अशी माहिती राज्याच्या विधानसभेंत सांगण्यांत आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस राज्यांतील विजेचें उत्पादन २·५ लाख किलोवॅट असेल तें तिसऱ्या कार्यक्रमाच्या अखेरीस ४·८० लाख किलोवॅटपर्यंत वाढविण्यांत येणार आहे.

**याक प्राण्याची पाहणी**—हिमालय पर्वताच्या उंचीवर असलेल्या भागांत याक नांवाचा प्राणी आढळतो. ह्या प्राण्याच्या जीवनाची पाहणी करण्याची एक योजना इंडिअन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च ह्या संस्थेनें आंखली आहे. हिमालयाच्या उंच भागांत कुसरा कोठलाहि चौखुरी प्राणी जगूं शकत नाहीं. ह्या प्राण्याचा तेथील लोकांच्या आर्थिक व्यवहारांशीं निकटचा संबंध असतो.

**युगोस्लाव्हिआकडून बोटींची खरेदी**—युगोस्लाव्हिआनें भारताला १ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलेलें आहे. ह्या कर्जापैकी कांहीं रक्कम भारतासाठी मालवाहू बोटी घेण्यासाठी खर्च करण्यांत येणार आहे. युगोस्लाव्हिआंतील बोटधंद्यांचें एक प्रतिनिधिमंडळ भारतांत आलें असून मालवाहू बोटीच्या खरेदीविषयीं तें बोट वाहतूक कंपन्यांशीं चर्चा करीत आहे. प्रत्येक बोट वाहतूक कंपनीला मध्यवर्ती सरकारनें कर्जाऊ रकमेपैकी कांहीं रक्कम मंजूर केलेली आहे.

**रशिआकडून तेलाची आयात**—रशिआहून ९,००० टन केरोसीन व २,००० टन डिझेल घेऊन लवकरच एक रशिअन बोट मुंबईला येईल. रशिआकडून केल्या जाणाऱ्या तेलाच्या आयातीचा हा दुसरा हप्ता आहे. आयात इंडिअन ऑइल कंपनीकडून केली जाते. मुंबईला दररोज १ लाख गॅलन रॉकेल लागतें. त्यांपैकी तिसरा हिस्सा गरज आतां वरील कंपनीकडून भागविली जाते.

**अंतराळांतील प्रवासाचा चित्रपट**—अमेरिकेनें चिंपँझी जातीच्या एका माकडास अग्निबाणाच्या साह्यानें १५५ मैल उंचीवर धाडले होते. ह्या अग्निबाणाचा वेग ताशीं ५,००० मैल होता आणि उड्डाणाच्या पहिल्या स्फोटाची शक्ति गुरुत्वाकर्षणाच्या १७ पट अधिक होती. आंतील माकडावर ह्या प्रयोगाची जी प्रतिक्रिया झाली तिचा चित्रपट घेण्याची व्यवस्था अग्निबाणांतच करण्यांत आली होती. चित्रपट अर्ध्या तासाचा आहे.

**पोलादाची सहकारी गिरणी**—प्रवरानगर ॲग्रिकल्चरल ॲंड इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट को-ऑपरेटिव्ह सोसायटी ही संस्था ऑइल एंजिनें, ट्रॅक्टर्सचे सुटे भाग व साखरेच्या कारखान्याची यंत्रसामग्री तयार करण्यासाठी काढण्यांत आली होती. आतां सोसायटीनें पोलादाच्या वस्तू तयार करण्याची गिरणी काढण्याचें ठरविलें आहे. गिरणीसाठी सात लाख रुपये भांडवल लागेल.

**उसाच्या उत्पादनाचा उच्चांक**—मिरजजवळ म्हैसाळ येथें उसाच्या उत्पादनाचा उच्चांक गांठण्याबद्दल श्री. पाटील नांवाच्या शेतकऱ्याचा सहकारी मंत्री ना. भारदे ह्यांनीं सत्कार केला. श्री. पाटील ह्यांनीं एका एकरांत ९६ टन ऊंस पिकवून दाखविला आहे. ऊंस १४ ते १५ फुटांपर्यंत उंच वाढला होता. खत म्हणून शेण, पेंड आणि नत्रयुक्त खतें ह्यांचा उपयोग करण्यांत आला.

**छोट्या उद्योगधंद्यांना मदत**—भारताच्या औद्योगीकरणांत मोठ्या उद्योगधंद्याबरोबरच छोटे उद्योगधंदे वाढविण्याचें मध्यवर्ती सरकारचें धोरण आहे. ह्या धोरणाला अनुसरून डिसेंबर, १९६० अखेर संपणाऱ्या ९ महिन्यांच्या कालांत सरकारनें २·५ कोटी रुपयांचीं कंत्राटी कामें छोट्या उद्योगधंद्यांना दिलीं, अशी माहिती प्रसिद्ध करण्यांत आली आहे.

**संततिनियमनावर विश्वास नाहीं?**—नवी दिल्ली येथें अणुविज्ञानाचा आरोग्यासाठी होणाऱ्या उपयोगासंबंधीं एक प्रदर्शन उघडण्यांत आलें आहे. ह्या प्रदर्शनांत बोलतांना भारताचे संरक्षण मंत्री श्री. कृष्ण मेनन म्हणाले कीं संततिनियमनाच्या साह्यानें कुटुंबनियोजन कितीहि करण्यांत आलें तरी जगाची लोकसंख्या कांहीं एका किमान मर्यादेच्या खालीं जाणार नाहीं. ह्या शतकाच्या अखेर भारताची लोकसंख्या ७० कोटी होईल असा अंदाज त्यांनीं केला.

**बलसाड येथें रासायनिक कारखाना**—बलसाड येथें एक रासायनिक कारखाना काढण्याचें काम ब्रिटनमधील हंफ्रे ॲंड ग्लासगो लि. ह्या कंपनीला मिळालें आहे. कारखान्याचा नमुना तयार करण्याचें व तो उभारण्याचें काम मुंबईच्या अतुल प्रॉडक्टस लि. ह्या कंपनीसाठी वरील ब्रिटिश कंपनी करणार आहे. कारखान्यासाठी १३ लाख पौंड भांडवल लागेल.

**नवीन प्रकारची ओष्ठशलाका**—अमेरिकेमधील एका रसायन शास्त्रज्ञानें ओठ रंगविण्याचें एक नवीन प्रसाधन शोधून काढलें आहे. हें प्रसाधन अमेरिकेच्या बाजारपेठेंत लवकरच येईल. ह्या प्रसाधनाचा विशेष म्हणजे तें खाण्याच्या वस्तूंपासून बनविण्यांत आलें आहे. साबुदाणा, द्रव चॉकोलेट आणि बटाटे ह्या वस्तू तें बनविण्यांत वापरलेल्या आहेत.

**संततिनियमनाची गोळी**—'एनोव्हिड' नांवाची संततिनियमनाची एक गोळी सध्यां अमेरिकेंत वापरली जाते. ह्या गोळीच्या कार्यक्षमतेविषयीं १,०१९ डॉक्टर्सना अभिप्राय विचारण्यांत आला असतां ६२४ डॉक्टर्सनीं अनुकूल मत दिलें आहे. ह्या गोळीबद्दल एक मुख्य आक्षेप असा आहे कीं, तिच्या सेवनानें स्त्रीच्या नैसर्गिक शरीरव्यापाराच्या कार्याला अडथळा उत्पन्न होतो.

# अर्थ

बुधवार, ता. १ मार्च, १९६१





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## इंडिअन इन्व्हेस्टमेंट सेंटरची स्थापना

भारताच्या औद्योगीकरणाला परदेशीय भांडवलाची गरज आहे ही गोष्ट आतां सर्वमान्य झालेली आहे. परदेशांतील भांडवल आकर्षित करून घेण्यासाठी खास प्रयत्न करण्यांत आले पाहिजेत ह्याबद्दलहि दुमत राहिलेलें नाहीं. ह्या दृष्टीनें विचार करतां नुकत्याच स्थापन करण्यांत आलेल्या इंडिअन इन्व्हेस्टमेंट सेंटर ह्या संस्थेचें महत्त्व उघड आहे. परदेशीय भांडवलाचा पुरवठा औद्योगीकरण करण्यासाठी सुलभतेनें व्हावा, असा ही संस्था स्थापन करण्याचा प्रमुख हेतु आहे. परदेशांतील ज्या भांडवलाला फायदेशीर गुंतवणुकीची अपेक्षा असते आणि भारतामधील ज्या उद्योगधंद्यांना भांडवलाची गरज असते त्यांची परस्पर सांगड घालण्याचें कामहि संस्था करणार आहे. आज हिंदमधील परिस्थिति अशी आहे कीं परदेशीय भांडवल मुरण्यास येथें चांगला वाव आहे. पण त्या मानानें भांडवलाचा प्रवाह मात्र पुरेसा येत नाहीं. १९५७ मध्यें भारतांत एकूण ५८ कोटी रुपयांचें परदेशीय भांडवल आलें. १९५८ मध्यें ५१ कोटी रुपयांचेंच परदेशी भांडवल आलें. जागतिक बँकेकडून मिळालेलीं कर्जें व भारतामधून बाहेर गेलेलें भांडवल जर लक्षांत घेतलें तर १९५७ सालीं देशांत आलेल्या परदेशीय भांडवलाचा आंकडा १६·८ कोटी रुपयेच भरेल आणि १९५८ सालीं तर हा आंकडा १·७ कोटी रुपयांपर्यंत खालीं गेलेला दिसेल. गेल्या दोन वर्षांत परदेशीय भांडवलाच्या आंत येणाऱ्या प्रवाहांत थोडी सुधारणा झालेली आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत खाजगी उद्योगधंद्यांत ३०० कोटी रुपयांचें परदेशीय भांडवल गुंतविण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. हें उद्दिष्ट गांठण्याच्या दृष्टीनें विचार करतां परिस्थितींत आजवर झालेली सुधारणा फारशी मोठी नाहीं, असें म्हणावें लागतें.

---

## कौटुंबिक भांडणतंट्याबाबत खास कोर्टें

मुंबईमध्यें रिझर्व्ह बँकेंतील एका नोकरानें आपल्या पत्नीस व मुलास ठार मारून आपणहि आत्महत्या केल्याची शोकजनक घटना नुकतीच घडली. गोष्टी ह्या थराला जाण्याइतकीं कडाक्याचीं कौटुंबिक भांडणें क्वचितच होतात असें मानलें तरी कुटुंबांत विसंवाद उत्पन्न होण्याचे प्रसंग आधुनिक जीवनांत अनेकदां उद्भवतात. क्षुल्लक कारणावरून कुटुंबांत तेढ उत्पन्न झाल्याचीं उदाहरणेंसुद्धां कमी आढळत नाहींत. कौटुंबिक मतभेदांची सोडवणूक करण्यासाठी खास कौटुंबिक कोर्टें स्थापन करण्यांत यावींत अशी सूचना भारताचे मुख्य न्यायाधीश श्री. पी. बी. सिन्हा ह्यांनीं केली आहे. गेल्या ऑक्टोबरमध्यें श्री. सिन्हा जपानला गेले असतां त्यांना तेथें अशीं कोर्टें असल्याचें आढळून आलें. जपानखेरिज इतर कांहीं देशांतहि अशीं कोर्टें असून तीं उपयुक्त कार्य करीत आहेत. वैवाहिक जीवनांत उत्पन्न होणारी कटुता नाहींशी करण्याच्या कामीं अगर घरगुती भांडणें स्नेहपूर्ण भावनेनें सोडविण्याच्या कामीं ह्या कोर्टांची चांगली मदत होत आहे. जपानमधील कौटुंबिक कोर्टें वकिलांची मदत न घेतां विरोधी पक्षांत तडजोड व समेट घडवून आणतात. निदान तसा प्रयत्न करतात. ह्या कोर्टांत दोन न्यायाधीश असतात व दोन साहाय्यक असतात. साहाय्यकांपैकीं एक पुरुष असतो व एक स्त्री असते. कोर्टांतील वातावरण अनौपचारिक व खेळीमेळीचें असतें. कौटुंबिक मालमत्तेची न्याय्य वांटणी करणें, अगर पतिपत्नींतील बेबनाव नाहींसा करणें हीं कामेंहि कोर्टें करतें. नेहमींच्या कोर्टांत अशीं प्रकरणें गेलीं तर त्यांना गैरवाजवी प्रसिद्धि मिळते व मूलभूत प्रश्न सुटणें अशक्य होतें असा अनुभव आहे. शिवाय अशा कज्ज्यामुळें चांगल्या सधन कुटुंबाचीहि वाताहत होण्याचा संभव असतो. हिंदु स्त्रियांना कांहीं विशिष्ट परिस्थितींत घटस्फोटाचा हक्क देण्यांत आलेला आहे. अशा परिस्थितींत कौटुंबिक कोर्टांची आवश्यकता फार आहे.

---

## जपानमधील डॉक्टरांचा एक दिवसाचा संप

संप हा शब्द उच्चारल्याबरोबर, आपलीं गाऱ्हाणीं वेशीवर टांगण्याचें कामगारवर्गाचें एक प्रभावी हत्यार, असा बोध होतो. खुद्द कामगारांचे प्रश्न सोडविण्याच्या बाबतींतसुद्धां हें हत्यार पुष्कळदां परिणामकारक ठरत नाहीं. तथापि अन्यायाविरुद्ध अगर मानल्या गेलेल्या अन्यायाविरुद्ध झगडण्याचें एक साधन म्हणून संपाचा उपयोग करण्यांत येतो. जपानमधील डॉक्टरांनीं व दंतवैद्यांनीं नुकताच एक दिवसाचा संप केला होता. अशा प्रकारचा हा पहिलाच संप होता. जपानमध्यें नॅशनल हेल्थ इन्शुरन्स स्कीम चालू आहे. ह्या योजनेप्रमाणें सरकारतर्फे डॉक्टरांना ठराविक दरानें फी देण्यांत येत असते. डॉक्टरांच्या व दंतवैद्यांच्या मतानें ही फी अपुरी असल्यानें तींत वाढ करण्याची मागणी त्यांनीं केली. शिवाय आरोग्यविम्याच्या कारभारांत त्यांना कांहीं बदलहि हवे होते. डॉक्टरांच्या म्हणण्याचा विचार करून जपानच्या सरकारनें फींत थोडी वाढ केली; पण ती त्यांना पुरेशी वाटली नाहीं. जपान मेडिकल असोसिएशन व जपान डेंटल असोसिएशन ह्या संघटनांतर्फे संप पुकारण्यांत आला होता. संप १०० टक्के अंमलांत आणण्याचा त्यांचा विचार होता. अगदीं तांतडीच्या वेळींहि उपचार न करण्याचें संघटनेनें ठरविलें होतें. पण अखेर लोकमताच्या दडपणामुळें कांहीं विवक्षित इस्पितळांत कांहीं डॉक्टरांना आणीबाणीच्या प्रसंगीं काम करण्याची मुभा देण्यांत आली. संप शंभर टक्के यशस्वी झाला तर त्याला तोंड देण्याची तयारी जपानच्या आरोग्यखात्यानें केली. रोग्यांना उपचार करण्यासाठी आरोग्य विमा योजनेप्रमाणें डॉक्टरांना मिळणारी फी दहा वर्षांपूर्वी ठरविण्यांत आलेली आहे. सार्वजनिक सुखसोयींच्या इतर क्षेत्रांत मोबदल्याची वाढ करण्यांत आलेली असतांना फक्त डॉक्टरांनाच फींत वाढ करण्याची मोकळीक सरकार देत नव्हतें.

---

## युनायटेड वेस्टर्न बँकेचें यशस्वी वर्ष

दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड, सातारा, या बँकेस १९६० हें वर्ष सर्व दृष्टीनें विशेष प्रगतिपर गेलें आहे. बँकेकडील ठेवींमध्यें चालू वर्षी रु. छत्तीस लाखांची वाढ झाली असून ऐकूण ठेवी रु. सव्वा दोन कोटींचे वर गेल्या आहेत. कर्जव्यवहारांत रु. साडे तेरा लाखांची वाढ होऊन एकूण कर्जे एक कोटी, दहा लाखापर्यंत आहेत. सरकारी कर्जरोख्यांतील गुंतवणुकींत रु. सात लक्ष, आठ हजारांची भर पडली असून रोखे, शेअर्स, वगैरेमधील गुंतवणूक रु. एक्काहत्तर लाखांची झाली आहे. व्याज, कमिशन वगैरेंच्या उत्पन्नांत रु. दोन लक्ष, पासष्ट हजारांची वाढ होऊन ऐकूण हें उत्पन्न रु. बारा लक्ष, बावन्न हजार झालें आहे. ठेवींतील वाढी मुळें ठेवींवरील दिलेल्या व्याजांत रु. एक लक्ष, एकतीस हजारांची वाढ झाली असून व्याजाचा खर्च रु. पांच लक्ष, त्रेपन्न हजार झाला आहे. बँकेच्या निव्वळ नफ्यांत रु. अडुसष्ट हजारांची वाढ होऊन करपात्र असा रु. दोन लक्ष, चौतीस हजार नफा आहे. नोकरवर्गासाठी दीड महिन्याच्या मूळ पगाराइतकी रक्कम बोनस-साठी देणेचें ठरविलें आहे. नफ्यांतून रिझर्व फंडाकडे रु. पन्नास हजार वर्ग करणेंचें ठरविलें आहे व मागील वर्षी दिलेल्या रु. सात न. पै. वीस टक्के डिव्हिडंडमध्यें वाढ करून १९६० सालाकरतां नऊ टक्के करपात्र डिव्हिडंड देणेचें योजिलें आहे.

## कोणत्या शाखांचें ऑडिट केलेंच पाहिजे?

कंपनी कायद्याच्या २२८ व्या कलमाच्या दुरुस्तीकडे बँकिंग कंपन्यांचें लक्ष मुद्दाम वेधण्यांत येत आहे. सर्व बँकिंग कंपन्यांचें वर्ष ३१ डिसेंबर, १९६० रोजीं, म्हणजे दुरुस्त कंपनी कायदा अंमलांत आल्यानंतर संपतें. तेव्हां, सर्व बँकिंग कंपन्यांनीं आपल्या प्रत्येक शाखेचें ऑडिट करवून घेतलें पाहिजे; १३ जानेवारी, १९६१ रोजीं गॅझेटांत प्रसिद्ध केलेल्या नियमांप्रमाणें अशा ऑडिटची माफी असेल तर ऑडिट आवश्यक नाहीं. ज्या शाखेचा धंदा २ लक्ष रुपयांपेक्षा जास्त नाहीं किंवा कंपनीच्या (सर्व शाखा धरून) एकूण उलाढालीच्या २% पेक्षा जास्त नाहीं, अशा शाखेला ऑडिटची आपोआपच माफी आहे. इतर शाखांचे बाबतींत २२८ व्या कलमाचें पालन केलें पाहिजे, नाहींतर सरकारकडे अर्ज करून ऑडिटची माफी मुद्दाम मिळविली पाहिजे.

## अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेची राजूर येथें २४ वी शाखा

अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळानें येत्या मार्च व एप्रिल या महिन्यांत बँकेच्या चार नवीन शाखा उघडण्याचा निर्णय घेतला आहे. आतांपर्यंत एकूण २३ शाखा उघडण्यांत आल्या असून ता. १३ मार्च, १९६१ रोजीं बँकेची २४ वी शाखा राजूर (ता. आकोलें) येथें बँकेचे चेअरमन श्री. मो. कुं. फिरोदिया यांचे हस्तें दुपारीं १ वा. उघडण्यांत येणार आहे. अकोलें तालुक्यांत आतां सहकारी बँकेच्या २ शाखा होतील.

## केदारनाथ-बद्रिनाथाच्या यात्रेकरूंसाठी

सध्यां बर्फाच्छादित असलेलीं केदारनाथ आणि बद्रिनाथ हीं देवालयें अनुक्रमें ४ मे व १२ मे रोजीं यात्रेकरूंसाठी खुलीं होतील.

## नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सेंट्रल को. बँक लि.

वरील बँकेचा सुवर्ण-महोत्सव दि. २६-६-१९६० रोजीं महाराष्ट्राचे मुख्य मंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण ह्यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा झाला. त्यानिमित्त प्रकाशित केलेला स्मारक ग्रंथाची एक प्रत आमचेकडे आली आहे. इतर बँकांनीं असे स्मारक ग्रंथ तयार करतांना हा ग्रंथ आदर्श म्हणून पुढें ठेवावा, अशा उच्च दर्जाचा तो झाला आहे. विशेष म्हणजे, संस्थापक व भूतपूर्व कार्यकर्ते ह्यांचें स्मरण ठेवून त्यांच्या दूरदृष्टीस आणि कार्यास प्राधान्य देण्यांत आलें आहे. सर्व ज्ञात-अज्ञात कार्यकर्त्यांच्याबद्दल विनम्रभावानें कृतज्ञता व्यक्त केली आहे. महोत्सव-वर्षापुरतें पदाधिकारी असूनहि स्मारकग्रंथांत अग्रस्थान घेणाऱ्यांना ह्या ग्रंथापासून पुष्कळच शिकण्याजोगें आहे. बँकेचे माजी मॅनेजर व माजी जनरल मॅनेजर ह्यांच्याहि सेवेचें योग्य गुणग्रहण केलेलें आहे.

## बोरीबंदर व पुणें येथें उतारूंसाठी लॉकर्स

रेल्वे उतारूंच्या सोईसाठी मुंबई (बोरीबंदर) व पुणें स्टेशनांवर सेफ डिपॉझिट लॉकर्स बसविण्यांत आले आहेत. प्रत्येक लॉकरची रुंदी ३६", उंची १२" आणि खोली १७" आहे; म्हणजे त्यांत लहान सुटकेस सहज मावूं शकते. लॉकरचें भाडें दिवसाला ५० न. पैसे असून किमान आकार १ रु. आहे. ५ रु. डिपॉझिट ठेवावें लागतात, ते लॉकर सोडतेवेळीं परत मिळतात. ज्यास्तींत ज्यास्त सात दिवसांपर्यंत लॉकर्स मिळूं शकतात.

## ८ मे रोजीं सुट्टी

रवींद्रनाथ टागोरांचा १०० वा जन्मदिन, म्हणून ८ मे, १९६१ रोजीं भारत सरकारनें सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे.


दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड, पुणें.

# नोटीस

नोटीस देण्यांत येते कीं बँकेचे भागीदारांची २६ वी वार्षिक साधारण सभा मंगळवार दिनांक २८ मार्च, १९६१ रोजीं दुपारीं २-३० वाजतां (भारतीय प्रमाण वेळ) बँकेचें रजिस्टर्ड ऑफिस, महाराष्ट्र बँक इमारत, ११७७ बुधवार पेठ, पुणें शहर या ठिकाणीं नेहमींचे कामकाजासाठी म्हणजे ३१ डिसेंबर, १९६० चा ताळेबंद व नफातोटापत्रक यांचा विचार करणें, डिव्हिडंड मंजूर करणें, निवृत्त होणारे संचालकांचे जागीं संचालकांची निवडणूक करणें, हिशेब तपासनीसांची नेमणूक करणें वगैरेंसाठी व कांहीं विशेष स्वरूपाचे कामकाजासाठी भरेल. सभेपुढें येणारे विशेष स्वरूपाचे कामकाजाचा तपशील भागीदारांस बँकेचा दि. ३१ डिसेंबर, १९६० अखेरचा ताळेबंद व नफातोटा पत्रक व संचालकांचा अहवाल यांसोबत स्वतंत्रपणें पाठविण्यांत येत आहे.

बोर्डाचे हुकुमावरून

पुणें, सी. व्ही. जोग,

दि. २१ फेब्रुवारी, १९६१ जनरल मॅनेजर.

बँकेचीं शेअर ट्रॅन्सफर बुकें दिनांक १५ मार्च, १९६१ ते दिनांक २९ मार्च, १९६१ (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

* डिव्हिडंड मंजूर झाल्यानंतर तें शुक्रवार दिनांक ७ एप्रिल, १९६१ पासून दिलें जाईल. डिव्हिडंड वॉरंटस् भागीदारांच्या नोंदलेल्या पत्त्यांवर टपालानें पाठविलीं जातील.

पत्ता बदलला असल्यास बँकेकडे सत्वर कळवावें.

## मदुरा शहराला दूध पुरविण्याची योजना

मदुरा शहराला रोज ५०,००० पौंड दुधाचा पुरवठा करणारी एक योजना आखण्यांत आली असून तत्संबंधीं प्राथमिक कामाला लवकरच प्रारंभ होणार आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शेती व अन्न संघटनेच्या तज्ज्ञांनीं ह्या योजनेची पाहणी केलेली आहे. मदुरा को–ऑपरेटिव्ह मिल्क सप्लाय युनिअन ह्या नांवाची एक संस्था ही योजना कार्यवाहींत आणण्यासाठी स्थापन करण्यांत येणार आहे. एकंदर योजनेसाठी ४८ लाख रुपये खर्च येणार आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे योजनेसाठी लागणारी यंत्रसामग्री पुरविण्यांत येणार असून तिची किंमत १६ लाख रुपये आहे. मदुरा शहरापासून ६ मैलांवर १५ एकर जमिनीवर गौळवाडा स्थापन करण्यांत येणार आहे. गौळवाड्यांत दूध निर्जंतुक करण्याची यंत्रसामग्री बसविण्यांत येणार असून त्याशिवाय, शीतगृह व दुधाचे टिकाऊ अन्नपदार्थ तयार करण्याची व्यवस्थाहि करण्यांत येईल. मदुरा शहराची लोकसंख्या ६ लाख आहे व त्यांत कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांचा बराच भरणा आहे. दुधाचा धंदा खाजगी धंदेवाल्यांचे हातीं असून बाजारांत दुधाचे भाव चढीचे असल्यानें पुष्कळ लोकांना दूध घेणें परवडत नाहीं. संयुक्त राष्ट्र संघटना सुरू झाल्यापासून १० वर्षांच्या काळांत सहकारी युनिअननें २४ लाख रुपयांचें दूध पुरवावें, अशी संयुक्त राष्ट्र संघटनेची अपेक्षा आहे. दुधाचे दर बेताचे ठेवण्यांत यावे व त्या दरानें कामगार, मुलें आणि गर्भवती स्त्रिया ह्यांना दुधाचा पुरवठा करण्यांत यावा. असा उद्देश आहे.

## अल्प मुदतीच्या व्याजावरील बंधनें दूर केलीं

पैशाची विलक्षण तंगी लक्षांत घेऊन, रिझर्व्ह बँकेनें शेड्यूल्ड बँकांनीं अल्प मुदतीच्या कर्जावर द्यावयाच्या व्याजावरील बंधनें दूर केलीं आहेत. २१ सप्टेंबर, १९६० रोजीं रिझर्व्ह बँकेनें, हें व्याज "बँकरेट वजा ½" ह्या दरापेक्षा जास्त असूं नये असें ठरविलें होतें. २१ दिवसांच्या व त्याच्यापेक्षा कमी मुदतीच्या ठेवींना हें बंधन लागू होतें. गेल्या महिन्यांत, रिझर्व्ह बँकेनें, शेड्यूल्ड बँकांकडील नव्या ठेवी स्वतःकडे घेण्याची योजना रद्द केली. शेड्यूल्ड बँकांवरील ताण कमी करण्यासाठी हे सर्व प्रयत्न आहेत. रिझर्व्ह बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याजाच्या दराचा जबरपणा कमी करण्यांत यावा, अशी बँकांची मागणी आहे; सध्यां व्यापार-उद्योगाची नेहमींची गरजहि बँका भागवूं शकत नाहींत, अशी परिस्थिति आहे.

---

## सन १९६० मध्यें ४११·४२ कोटी रु. चीं विमापत्रें

आयुर्विमा कॉर्पोरेशननें जानेवारी–डिसेंबर १९६० या काळांत एकूण ४११·४२ कोटी रु. चीं विमापत्रें पूर्ण केलीं. विमापत्रांचे विभागवार आंकडे पुढीलप्रमाणें :—उत्तर विभाग ६२·५० कोटी रु.; मध्य विभाग ५५·२७ कोटी रु; पूर्व विभाग ८६·८६ कोटी रु.; दक्षिण विभाग १०७·४१ कोटी रुपये. पश्चिम विभाग ९७·४८ कोटी रु. याखेरीज याच काळांत परदेशामध्यें एकूण ७·९६ कोटी रु. चीं विमापत्रें कॉर्पोरेशननें पूर्ण केलीं.


दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार

कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक: - श्री. वा. काळे, संपादक, 'अर्थ'

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.



## तांत्रिक प्रगति हें साध्य नव्हे, साधन आहे

खरगपूर येथील इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलजी ह्या संस्थेचा वार्षिक पदवीदानसमारंभ भारताचे अमेरिकेंतील भूतपूर्व वकील श्री. गगनविहारी मेहता ह्यांच्या अध्यक्षतेखाली झाला. समारंभासाठी आलेल्या ५०० स्नातकांसमोर भाषण करतांना श्री. मेहता ह्यांनीं तंत्रविद्येच्या महत्त्वाकडे लक्ष वेधलेंच; पण त्याचबरोबर तंत्रविद्येबाबत सावधानतेचा इशाराहि दिला. ते म्हणाले कीं, अलीकडे भारतांत भौतिक प्रगतीवर आणि वाढत्या उत्पादनावर विशेष भर देण्यांत येत आहे. ह्या गोष्टींची आवश्यकता आहे ह्यांत शंकाच नाहीं. पण त्याचबरोबर जीं मूल्यें पाळल्यामुळें उत्तम नागरिक तयार होतील अशा मूल्यांचा विसर पडूं देतां कामा नये. राजकीय दृष्ट्या पारतंत्र्यांत असलेल्या इतर देशांतील लोकांप्रमाणेंच भारतामधील लोकांची अशी समजूत झालेली आहे कीं, त्यांच्या पुढील सर्व मूलभूत प्रश्न स्वातंत्र्यामुळें व शासनपद्धति बदलल्यामुळें सुटतील. पण अनुभव असा येत आहे कीं, स्वातंत्र्य हें एक साधन आहे आणि स्वातंत्र्याबरोबरच जबाबदारीहि येत असते. लोकांपुढें असलेल्या गुंतागुंतीच्या प्रश्नांना साधें, सरळ उत्तर नाहीं. केवळ तांत्रिक प्रगतीमुळें सर्व प्रश्न सुटतील असें समजणें चुकीचें आहे. तंत्रविद्येंतील प्रगतीमुळें लोकांचे कष्ट हलके होतील. तांत्रिक प्रगति झाली नाहीं तर लाखों लोकांना सर्व जन्मभर कष्टच उपसावे लागतील. भारतापुढें असलेल्या प्रश्नाचें वर्णन वाढत्या आकांक्षांचें आव्हान असें करण्यांत आलेलें आहे. या आव्हानाला यशस्वीरीत्या तोंड देण्यासाठी तंत्रविद्या आत्मसात करून व राष्ट्रीय उत्पन्नांत वाढ करून लोकांचा राहणीचा निकृष्ट दर्जा उंचावला पाहिजे. दुसरा मार्गच नाहीं.

इतर कांहीं देशांनीं जी प्रगति दोन-तीन शतकांत केली ती प्रगति कांहीं शतकांत करण्याचा भारताचा प्रयत्न आहे. तथापि तंत्रविद्येमुळें होणारी प्रगति हें साधन आहे, साध्य नव्हे. प्रगतिमान, समतोल आणि कार्यक्षम अशा प्रकारचें राष्ट्र निर्माण करण्याचें तें एक साधन आहे. पश्चिम युरोपांतील देश, अमेरिका, सोव्हिएट रशिया व जपान ह्यांनीं विलक्षण प्रगति केलेली आहे. पुष्कळदा त्यांची तांत्रिक प्रगति भयावहसुद्धां वाटते. अर्थात् प्रत्येकाचा मार्ग व पद्धत एकच आहे असें नाहीं त्याचप्रमाणें भारतामधील परंपरा आणि परिस्थिति ह्यांचा विचार करून स्वतंत्रपणें मार्ग काढण्याची जरूरी आहे. भारत आज अशा जगांत नांदत आहे कीं, तांत्रिक प्रगतीखेरीज भौतिक सुधारणा घडवून आणतांच येणार नाहीं. आज भारत तांत्रिक प्रगतीसाठी व तंत्रज्ञांसाठी परदेशांवर अवलंबून आहे. हें असेंच कायमचें चालणार नाहीं. भारताला आपला विकास करून घेण्याची फार मोठी शक्यता आहे. ही शक्यता प्रत्यक्ष कोटींत आणली गेलीच पाहिजे. गेल्या कांहीं वर्षांत भारतानें औद्योगिक क्षेत्रांत बरीच प्रगति केलेली आहे. ह्याहीपेक्षा अधिक प्रगति करण्याचे प्रयत्न चालू आहेत. पण ह्या प्रगतीपैकी बरीच प्रगति परदेशी तंत्रज्ञांच्या साह्यानें झालेली आहे. परदेशीय तंत्रज्ञ व तांत्रिक ज्ञान ह्यांची जागा भारतीय तंत्रज्ञांनीं आणि स्वतंत्र तांत्रिक ज्ञानानें घेतली पाहिजे. तरच भारताचें ह्या बाबतींतलें परावलंबित्व नाहींसें होईल. तंत्रज्ञांबरोबर विचारविनिमय करण्याची पात्रता भारतीय तंत्रज्ञांच्या अंगीं आली पाहिजे. तसें झाल्यावरच भारताची स्वतंत्र तंत्रविद्या निर्माण होऊं शकेल

---

## दी बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड

### २०% करपात्र डिव्हिडंड मिळणार

दि. ३० जून १९६० अखेर संपलेल्या वर्षी उत्पादन आणि मॅनेजमेंटचा खर्च आणि रु. १७,६०,३६५-१६ ची घसारा, डेव्हलपमेंट रीबेट, बोनस, ग्रॅच्युइटी व कर यांसाठी योग्य ती तरतूद केल्यावर सिंडिकेटला निव्वळ नफा रु. १३,३७,३३६-०४ झाला आहे. त्यांत गतवर्षीच्या नफ्याची शिल्लक राहिलेली रक्कम रु. २,४८,१०५-२० मिळवितां विनियोगाकरितां एकूण नफा रु. १५,८५,४४१-२४ राहात आहे. (१) रीहॅबिलिटेशन रिझर्व रु. ७,५०,०००-००, (२) डिव्हिडंड इक्वलायझेशन फंड रु. १,५०,०००-००, आणि (३) वेल्फेअर फंड रु. ४,८६३-९५, असा एकूण रु. ९,०४,८६३-९५. विनियोग केल्यानंतर पुढील वांटणीसाठी रु. ६,८०,५७७-२९ इतका नफा शिल्लक राहतो. त्यांतून क्यु. प्रे. शेअर्सवर द. सा. द. शें. रु. ७·१४२ (निव्वळ ५%) आणि ऑर्डिनरी शेअर्सवर २०% करपात्र डिव्हिडंड देण्यांत येणार आहे आणि पुढील वर्षासाठी १,७२,५७७ रु. शिल्लक राहाणार आहेत.

---

### भारतांत ब्रिटिश व अमेरिकन भांडवलांत वाढ

भारतांत १९४८ ते १९५८ या मुदतींत ब्रिटिश आणि अमेरिकनांच्या भांडवल गुंतवणुकीच्या प्रमाणांत उल्लेखनीय वाढ झाली. ब्रिटिश भांडवल १९४८ मधील २०६·०२ कोटी रुपयांवरून वाढून १९५८ मध्यें ३९८·०३ कोटी रुपयांवर गेलें. म्हणजे या मुदतींत त्यांत ९३·२ टक्क्यांनीं वाढ झाली. अमेरिकन भांडवल ४३५८ टक्क्यांनीं वाढलें. १९४८ मधील ११·१७ कोटी रुपयांवरून वाढून तें १९५८ मध्यें ५९·८५ कोटी रुपये झालें.

---


**Statement about ownership and other particulars about ARTHA to be published in the first issue every Newspaper year after last day of February.**

**Form IV**

*(See Rule 8)*

1. Place of Publication ... Durgadhivasa, Poona 4.
2. Periodicity of its Publication ... Weekly
3. Printer's Name ... K. G Sharangpani
   Nationality ... Indian
   Address ... 915/1, Shivajinagar Poona 4.
4. Publisher's Name ... S. V. Kale
   Nationality ... Indian
   Address ... Durgadhivasa, Poona 4.
5. Editor's Name ... S. V. Kale
   Nationality ... Indian
   Address ... Durgadhivasa, Poona 4.
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital. ... S. V. Kale

I, S. V. Kale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 1-3-1961 **S. V. KALE**
Signature of Publisher

# Notice

**Bhor State Bank Limited, Bhor.**

Notice is hereby given that the 17th Ordinary General Meeting of the Shareholders of Bhor State Bank, Ltd., will be held at the registered office of the Bank, at Rajawada Chowk, Bhor (Dist. Poona) at 1-30 p. m. (S. T.) on Wednesday the 29th March 1961 to transact the following business: —

(1) To receive and consider the Balance Sheet, Profit and Loss Account and the report of the Directors and Auditors for the year ended on 31st December 1960.

(2) To elect Directors in place of the retiring Directors who are eligible for re-election.

(3) To appoint Auditors for the current year and to fix their remuneration.

(4) To transact such other business as may be allowed by the Chairman.

The following special resolutions will be moved as special resolutions immediately after the ordinary business has been disposed off :—

Special Resolution No. 1 :—To elect a Director in place of Shri. Madhwaraj Vyankatesh Shingre, who retires but being elgible, offers himself for re-election and to consider and if thought fit to pass the following resolution of which a special notice as required by section 281 of the Companies Act and the relative explanatory statement concerning which is annexed hereto as required by Section 173 of the said Act.

Special Resolution. No. 2 :— "Resolved that pursuant to the provisions of Section 281 and other applicable provisions (if any) of the Companies Act, 1956. Shri. Madhwaraj Vyankatesh Shingre who has attained the age of 67 years and who retires by rotation be and is hereby re-elected a Director of the Company and is hereby specially declared that the agelimit for Directors prescribed under Section 280 of the said Act shall not apply to him.

**Annexture to the Notice**

Explanatory Statement as required by Section 173 of the Companies Act, 1956.

In conformity with the Companies Act 1956, which came into force on the 1st April 1956, the following Explanatory Statement as required by section 173 of the afore said Act, sets out all material facts relating to notice No. 1 and 2 mentioned in the notice dated 26-2-1961.

In respect of Special Resolution No. 2 it is notified that Shri M. V. Shingre who retires and is eligible for re-election has attained the age of 67 years and hence he cannot be elected a Director of the Company except by a resolution in respect of which a special notice has been given in accordance with the requirements of sections 190 and 281 of the Companies Act, 1956.

The company has received such a special notice from some members notifying to move the resolution as set out in the said item.

Shri M. V. Shingre has been a Director on the Board of Directors since 1944. He is a person of wide and varied experience and during the long period of his association with the Bank, is found very useful.

By Order of the Board

Poona, 26th Feb. 1961.

**B. A. Rajeshirke**
Acting Chief Executive Officer.

*N. B.*—(i) The share transfer books of the Bank will be closed from 20-3-61 to 10-4-61 (both days inclusive).

**पलाई बँकेच्या ठेवीदारांना प्रत्येकी २५० रु.**

पलाई सेंट्रल बँकेच्या प्रत्येक ठेवीदाराला त्याच्या ठेवींपैकी २५० रु. येत्या दोन महिन्यांत देण्यांत येतील; एकूण १ कोटि, ४ लक्ष रु. अशा रीतीनें वाटण्यांत येतील.

**घाना एअरवेज पूर्णपणें सरकारी मालकीची**

जुलै, १९५८ मध्यें घानाची नॅशनल एअरलाइनची स्थापना झाली, तेव्हां त्यांतील ४०% भाग ब्रिटिश ओव्हरसीज एअरवेज कॉर्पोरेशनचे होते. ते आतां घाना सरकारनें विकत घेतले आहेत. त्यामुळें घाना एअरवेज पूर्णपणें सरकारी मालकीची झाली आहे.

**मुंबई राज्यांतील सरकारी साखर कारखान्यांविषयीं ३०-६-१९६० पर्यंतची तांत्रिक माहिती**

| अ. नं. | कारखान्याचें नांव | गाळितास आलेला ऊंस | उसांतील साखरेचें प्रमाण | हंगामांतील सरासरी उतारा | २२ तासांच्या एका दिवसांत गाळलेला ऊंस सरासरी—टन | हंगामाचे एकूण दिवस |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | प्रवरा | २,०८,७०१ | १३·८४ | ११·३२ | १,१४९·७२ | १८४ |
| २ | कोपरगांव | १,६५,२७१ | १४·२४ | ११·५७ | ९९२·४२ | १६४ |
| ३ | छत्रपती | ९८,५७४ | १४·०३ | ११·८३ | ७२७·०० | १३२ |
| ४ | श्री खेडुत | ४७,६६५ | १२·५४ | १०·१६ | ६२५·६८ | ८२ |
| ५ | श्रीराम | १,२८,९१२ | १४·२६ | १२·३१ | ७९८·१६ | १६१ |
| ६ | माळेगांव | १,३५,१९३ | १४·९५ | १२·४६ | — | १८६ |
| ७ | राहुरी | १,५६,१७१ | १४·५८ | १२·०२ | ९८५·०० | १७३ |
| ८ | अशोक | १,४२,९३१ | १४·३३ | १२·०४ | ९७५·७० | १०७ |
| ९ | गणेश | १,३७,१६८ | १४·०३ | ११·५८ | ९४०·९४ | १४६ |
| १० | भोगावती | ९३,९४० | १३·३८ | १०·८४ | १,०२१·६८ | — |
| ११ | गिरणा | १,१७,२५८ | १३·२ | १०·८० | ७८९·६१ | ८९ |
| १२ | पंचगंगा | ८५,०६२ | १४·०३ | ११·९६ | ९४८·८६ | — |
| १३ | शेतकरी | ७५,५२५ | १३·८५ | ११·६९ | ९२७·७४ | ८९ |
| १४ | वारणा | ६५,७८८ | १४·८२ | १२·७२ | १,०१७·०० | ९० |

**रशिआची मजबूत अर्थव्यवस्था**—रशिआचे उपपंतप्रधान मि. कॉसिजिन सध्या भारतांत आले आहेत. दिल्ली येथें रशियाच्या अर्थव्यवस्थेसंबंधी बोलतांना ते नुकतेंच म्हणाले कीं, रशिअन आंकडे शास्त्रज्ञांनीं केलेल्या अंदाजाप्रमाणें १९६५ सालीं रशिया सर्व प्रकारच्या उत्पादनाच्या बाबतींत अमेरिकेच्या पुढें जाईल. आजचा रशिआ व क्रांतिपूर्व रशिआ ह्यांच्या अर्थव्यवस्थेची त्यांनीं तुलना केली.

**शिक्षकांची अधिक तरतूद**—मद्रास सरकारनें आपल्या राज्यांत शिक्षकांसाठी चालू केलेली विविध तरतुदींची व्यवस्था इतर राज्यांनींहि अमलांत आणावी अशी शिफारस मध्यवर्ती सरकारच्या शिक्षणखात्यानें केली आहे. मद्रास राज्यांत सर्व शिक्षकांना पेन्शन, प्रॉव्हिडंट फंड व विमा असा तिहेरी फायदा मिळतो. मध्यवर्ती सरकारच्या अधिकारांत असलेल्या प्रदेशांतहि ही योजना चालू होण्याचा संभव आहे.

**अंतराळ प्रवासासाठी प्रयोग**—फ्रेंच शास्त्रज्ञांनीं अग्निबाणाच्या साह्यानें एक पांढरा उंदीर ९३ मैल उंचीवर पाठविला होता. उंदीर ठेवण्यांत आलेली पेटी नंतर स्फोटाच्या ठिकाणापासून २८ मैलांवर सांपडली. उंदीर जिवंत होता. अंतराळांतील त्याच्या प्रवासांत त्याचें वजन शून्यावर आलें होतें. असें झाल्यावर त्याच्या मेंदूमधील विजेच्या प्रवाहाचें स्पंदन शास्त्रज्ञांनीं यंत्राच्या साह्यानें तपासलें.

**चीनमधील दुष्काळ**—चीनमधील दुष्काळाची तीव्रता आणखी दोन महिन्यांच्या काळांत कमी होईल असें म्हणतात. त्या सुमारास चीनमधील नवें पीक बाजारांत येऊं लागेल आणि ऑस्ट्रेलिआ व कॅनडा ह्यांच्याकडून गव्हाची आयातहि होऊं लागेल. चीननें ऑस्ट्रेलिआ व कॅनडाकडून ३० लाख टन अन्नधान्य घेण्याचा करार केला असून, तें आणण्यासाठी ६० बोटींची व्यवस्था केली आहे. अन्नधान्याच्या टंचाईमुळें रोगराईहि वाढली आहे.

**ग्रामीण भागांना वैद्यकीय मदत**—विदर्भांतील ग्रामीण भागांतील लोकांना वैद्यकीय मदत देण्यासाठी महाराष्ट्र सरकारनें चांद्याजवळ एक शिबिर उघडलें आहे. शिबिराच्या पहिल्याच दिवशीं शस्त्रक्रियेसाठी ४५० रोग्यांची नोंद करण्यांत आली. ह्या शिबिरांत मुंबई व नागपूरमधील १२ शस्त्रवैद्य आहेत. दोन स्त्री-शस्त्रवैद्य आहेत. चार शस्त्रक्रियागृहांची सोय असून १२५ परिचारिका शिबिरांत काम करतात.

**पश्चिम जर्मनीकडून मदत**—भारताला आर्थिक मदत देणाऱ्या देशांची बैठक एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यांत वॉशिंग्टन येथें भरणार आहे. भारताचा तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम १२ हजार कोटी रुपये खर्चाचा आहे. पश्चिम जर्मनीकडून भारताला कार्यक्रमासाठी २५० कोटी रुपये मदत मिळण्याची शक्यता आहे. १९६५–६६ सालापासून भारताची अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण करण्याची खटपट चालू आहे.

**बहुभाषिक शब्दकोश**—मुंबई येथील बहुभाषिक श्री. विश्वनाथ नरवणे ह्यांनीं पंतप्रधान नेहरूंना भारतीय व्यवहारकोश म्हणून एक बहुभाषिक शब्दकोश नजर केला आहे. ह्या शब्दकोषांत भारताच्या निरनिराळ्या १६ भाषांतील ४० हजार शब्द दिलेले आहेत. त्याशिवाय नेहमी वापरण्यांत येणारे ३७५ शब्दप्रयोग व त्यांचे १४ भाषांतील समानार्थी प्रयोगहि देण्यांत आले आहेत. भाषांच्या तौलनिक अभ्यासाला कोशाचा चांगला उपयोग होईल.

**सरकार गिरण्या चालविणार**—गुजरात सरकारचे उद्योगमंत्री श्री. छोटुभाई पटेल ह्यांनीं राज्याच्या विधानसभेंत अशी माहिती सांगितली कीं गेल्या कांहीं वर्षांत राज्यांतील ६ कापड गिरण्या बंद पडल्या आहेत. गैरव्यवस्था अगर आर्थिक अडचणींमुळें त्या बंद पडल्या होत्या. ह्या गिरण्यांपैकीं दोन गिरण्या सरकार चालविण्यासाठी स्वतःकडे घेणार असल्याचें त्यांनीं जाहीर केलें.

**मध्यप्रदेशाजवळील धान्याचा सांठा**—मध्यप्रदेश सरकारजवळ ५ कोटी रुपये किंमतीचा अन्नधान्याचा सांठा आहे. ह्या साठ्याची विक्री करण्याचे प्रयत्न सरकार करीत आहे. पण, किंमती जास्त वाढल्यामुळें महाराष्ट्र व गुजरात सरकारनें धान्य विकत घेण्याचें नाकारलें आहे. धान्याची विक्री करतांना राज्यसरकारला तोटा आला तर तो अंशतः भरून काढण्याची तयारी मध्यवर्ती सरकारनें दाखविली आहे.

**निराश्रितांसाठी इमारत**—मोठाल्या शहरांतून राहत्या जागेची टंचाई असल्यानें पुष्कळ लोक पदपथावर झोपतात. अशा लोकांची रात्रीं झोपण्याची सोय करण्यासाठी अहमदाबादमध्यें एक दोन मजली इमारत बांधण्यांत येणार आहे. ह्या इमारतींत दररात्रौ १० नये पैसे देऊन लोकांना झोपतां येईल. इमारतींत २०८ लोकांची झोपण्याची सोय होईल. तीसाठी मध्यवर्ती सरकार साह्य देणार आहे.

**साखरविषयक संस्थेचें ठिकाण**—महाराष्ट्रांत साखरविषयक संशोधन संस्था काढण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें आहे. ही संस्था नगर जिल्ह्यांत श्रीरामपूर येथें काढण्यांत यावी असें मत मजूरपुढारी श्री. ओगले ह्यांनीं व्यक्त केलें आहे. नगर जिल्ह्यांत आजच ११ साखरेचे कारखाने असून लवकरच त्यांची संख्या १६ पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. नगर जिल्ह्यांत सर्वांत अधिक साखरकारखाने आहेत.


स्थापना १९३६

**दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा**

**[ शेड्यूल्ड बँक ]**

**हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.**

शाखा–१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नासिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. हलकर्णी, ११. इचलकरंजी, १२. फलटण, १३. अकलूज.

३१ डिसेंबर, १९६०

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ५,०१,००० |
| ठेवी | रु. | २,२५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,५९,००,००० |

ठेवींवरील नवीन व आकर्षक व्याजाचे दर

१. चालू खातें ०–५० २. सेव्हिंग्ज बँक १–५०

३. स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट ३–००

मुदत ठेवी—१ वर्ष ३–०० २ वर्षें ३–२५

३ वर्षें ३–७५ ५ वर्षें ४–००

रुपये एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम., जनरल मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन.

**झोपण्यासाठी खास डबा**— पुणें ते बंगलोर मार्गावर धावणाऱ्या एक्सप्रेस गाडीवर तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांना झोपतां यावें म्हणून खास डबा लावण्यांत येत आहे. ही सोय नुकतीच सुरू झाली आहे. ८०० किलोमीटर्सपेक्षा अधिक दूरचा प्रवास करणाऱ्यांना तिचा फायदा घेतां येईल. डब्यांत ६४ उतारूंना झोपून प्रवास करतां येईल.

**टोकिओ-मुंबई वैमानिक प्रवास**— एअर इंडिआ इंटर नॅशनलनें बोइंग७०० विमानाच्या साह्यानें मुंबई ते टोकिओ विमान-प्रवासाची सोय केली आहे. सध्यां दर आठवड्यांतून एकदाच खेप करण्यांत येणार आहे. मुंबई ते टोकिओ हें अंतर ९ तासांत तोडण्यांत येईल. येत्या एप्रिलपासून आठवड्यांतून दुसरी खेप चालू करण्यांत येईल. तोंपर्यंत सुपर कॉन्स्टेलेशन विमानाची आठवड्याची खेपहि चालू राहील.

**जर्मनींतील ज्योतिषांची चलती**—नव्या वर्षाच्या पहिल्या कांहीं आठवड्यांत जर्मनीमधील ज्योतिषांची चांगली चलती असते. जर्मनींत ज्योतिष सांगणारे ३२० ज्योतिषी आहेत. भविष्य जाणून घेऊं इच्छिणाऱ्या लोकांत उद्योगपतीपासून सामान्य माणसांपर्यंत सर्व दर्जाचे लोक ह्या वर्षी आढळले. भविष्य सांगण्या-बद्दल ज्योतिषी २० मार्कपासून ८०० मार्कपर्यंत पैसे घेतात.

**प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी**—गुजरातचे सार्वजनिक बांधकाममंत्री श्री. रत्नुभाई अडाणी ह्यांनीं जुनागड नगरपालिकेला असा सल्ला दिला आहे, कीं प्रवाशांना आकर्षित करून घेण्यासाठी शहरांतील सुखसोयींची वाढ करण्यांत यावी. जुनागड हें सौराष्ट्रामधील इतिहासप्रसिद्ध शहर असून गिरनारला जाण्याची वाट तेथूनच आहे.

**पश्चिम जर्मनीकडून मिळणारी मदत**—तिसऱ्या पंच-वार्षिक कार्यक्रमासाठी पश्चिम जर्मनीकडून मिळणाऱ्या मदतीचा आकडा अद्याप निश्चित करण्यांत आलेला नाहीं. तथापि, पश्चिम जर्मनीकडून सुमारें २५० कोटी रुपयांचें कर्ज मिळण्याची शक्यता आहे. ह्या कर्जाच्या विनियोगाचा तपशील ठरविण्यासाठी जर्मन सरकारचें एक प्रतिनिधिमंडळ लवकरच भारतांत येणार आहे.

**पैसे गुंतविण्यासाठी कायद्यांत बदल**— भारतासारख्या देशांना दीर्घ मुदतीचीं कर्जे देतां यावीं म्हणून इटलीचें सरकार आपल्या पैसे गुंतविण्यासंबंधींच्या कायद्यांत बदल करून घेणार आहे. सध्यां इटलीचें एक व्यापारमंडळ भारतांत आलें आहे. भारताच्या औद्योगीकरणांत इटली कितपत भाग घेऊं शकेल ह्यांविषयीं मंडळानें भारत सरकारशीं चर्चा केली.

**रशिआकडून आणखी मदत मिळण्याची शक्यता**—रशिआनें भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला मदत म्हणून आतांपर्यंत सुमारें २५० कोटी रुपयांचें कर्ज दिलें आहे. त्याशिवाय आणखी मदत मिळण्याची शक्यता आहे. ह्यापूर्वी देण्यांत आलेल्या ६० कोटी रुपयांच्या एका कर्जाचा विनियोग करण्याचा तपशील ठरविण्यासाठीं रशिअन तज्ज्ञांची एक तुकडी भारतांत आली आहे.

**दक्षिण भारतांत पोलादाचा कारखाना**—तिसऱ्या पंच-वार्षिक कार्यक्रमांत मद्रास राज्यांत पोलादाची एक रोलिंग मिल काढण्यांत येणार आहे. ह्या कारखान्यासाठी १ कोटी रुपये भांडवल लागणार आहे. दक्षिण भारतामधील कारखान्यांना लागणारा पोलादाचा माल ह्या कारखान्यांतून मिळूं शकेल. त्यामधून दरसाल ४० ते ५० हजार टन वजनाचा माल तयार होऊं शकेल. कारखाना सार्वजनिक मालकीच्या विभागांत राहील.


स्थापना : १९३५ **दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.** मुख्य कचेरी : पुणें शहर

—: भांडवल :—

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... ... | रु. ३४,००,००० चे वर |
| गंगाजळी व इतर निधि | ... | रु. १६,६०,००० |
| खेळतें भांडवल | ... | रु. १६ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र, आंध्र आणि म्हैसूर राज्यांत मिळून बँकेच्या ५२ शाखा

★ सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

★ स्टर्लिंग व डॉलर करन्सीमधील प्रवासी चेक्स विकत मिळतात

★ परदेशी लेटर्स ऑफ क्रेडिट उघडलीं जातात

आमचे परदेशांतील प्रतिनिधि :

१. दि मिडलँड बँक लि., लंडन

२. बँकर्स ट्रस्ट कंपनी, न्यूयॉर्क

३. डॉइश बँक, प. जर्मनी

इतर प्रमुख देशांतहि एजन्सीजची सोय आहे.

जनरल मॅनेजर

### ब्रिटिश हायकमिशनरचा फावल्या वेळांतील छंद

ब्रिटनचे भारतामधील माजी हायकमिशनर मि. माल्कम मॅक्डोनल्ड ह्यांनीं दिल्लीमधील पक्षांच्याविषयीं एक ग्रंथ लिहिला आहे. त्यांच्या निवासस्थानाभोंवतीं असलेल्या विस्तीर्ण बागेत ह्या पक्षांची ये–जा सारखीच चालू असे. पक्षी आपलीं घरटीं बांधण्याचें काम करीत असतांनाच मि. मॅक्डोनाल्ड ह्यांनीं त्यांच्यावर बारीक नजर ठेवून त्यांच्या जीवनाविषयीं पुष्कळ माहिती जमा केली. वास्तविक, हायकमिशनरच्या हुद्यावर असणाऱ्या माणसाच्या मागें कामाचा ससेमिरा सारखाच असतो. पण एखाद्या गोष्टीचा छंद असला म्हणजे त्यापायीं होणारे श्रमसुद्धां हलके वाटतात ह्याचें हें एक उदाहरण आहे. पुस्तक लिहिण्यांत शास्त्रीय माहिती ग्रथित करण्याचा लेखकाचा हेतु नाहीं. दिल्लीमधील एका निसर्गरम्य ठिकाणाची ही एक मनोवेधक कथा आहे, असें म्हटलें तरी चालेल. दिल्लींत वर्षभरांत येणाऱ्या पक्षांची कालक्रमानुसार माहिती ह्या पुस्तकांत देण्यांत आली आहे. बदलत्या ऋतूबरोबर दिल्लीमधील पक्षांच्या प्रकारांतहि बदल पडत जातो. त्याचप्रमाणें बदलत्या ऋतुमानाबरोबर पक्ष्यांच्या हालचालींतहि फरक पडत जातो. पक्ष्यांचें जीवन माणसाच्या जीवनासारखेंच धांवपळीचें दिसून येतें. बिचारे सारखे अन्नाच्या शोधांत असतात. त्यांना मुंगसाचा आणि मोठ्या पक्ष्यांचा त्रास तरी किती सोसावा लागतो. सगळ्या धडपडींत घरटीं बांधणें, अंडीं घालणें आणि प्रजोत्पत्ति करणें, हीं त्यांचीं कामें चालूच असतात. मृत्यु तर त्यांना कोणत्या रूपानें उचलून नेईल त्याचा पत्ताच नसतो. पक्ष्यांच्या जीवनाचें ग्रंथकारानें केलेलें वर्णन त्याच्या मार्मिक निरीक्षणाची साक्ष बऱ्याच ठिकाणीं देते. फावल्या वेळाचा सदुपयोग एखाद्या छंदासाठी करून घेणें सहज साध्य होणारी गोष्ट नाहीं.

---

### मुंबईजवळ घड्याळें तयार करण्याचा कारखाना

मुंबईजवळ गोरेगांव ह्या उपनगरांत घड्याळें तयार करण्याचा एक कारखाना लवकरच स्थापन करण्यांत येणार आहे. इंडो–फ्रेंच टाइम इंडस्ट्रीज प्रायव्हेट लि. ही कंपनी फ्रेंच तंत्रज्ञांच्या साह्यानें हा उपक्रम हातीं घेत आहे. यंत्रसामग्री बसविण्याचें काम पुढील महिन्यांत सुरू करण्यांत येणार असून प्रत्यक्ष उत्पादनाला चालू सालअखेर प्रारंभ होईल असा अंदाज आहे. घड्याळांच्या किंमती अद्याप निश्चित करण्यांत आलेल्या नाहींत. पण त्या ५० ते १०० रुपयांपर्यंत असतील. इंडो–फ्रेंच टाइम कंपनीचें अधिकृत भांडवल ५० लाख रुपयांचें असेल. त्यांपैकी ४० लाख रुपयांचें भांडवल सध्यां विक्रीस काढण्यांत येणार आहे. फ्रेंच कंपनी एकूण भांडवलाच्या ५० टक्के रक्कम घालणार आहे; बाकीचें ५० टक्के भांडवल हिंदी असेल. तथापि, हिंदी कंपनी भांडवलासाठी खुल्या बाजारांत उतरणार नाहीं. फ्रेंच कंपनी प्रत्यक्ष भांडवल घालणार नसून कारखान्यासाठी लागणारी संपूर्ण यंत्रसामग्री, हत्यारें व इतर उपकरणें पुरविणार आहे. भारतामधील कामगारांना शिक्षण देऊन तयार करण्यासाठी फ्रेंच तंत्रज्ञ लवकरच भारतांत येतील. पहिल्या वर्षी कारखान्यांत ९०,००० घड्याळें तयार होतील. दुसऱ्या वर्षी १,६०,०००; तिसऱ्या वर्षी १,८०,०००; चौथ्या वर्षी २,६०,००० व पांचव्या वर्षी ३,१०,००० घड्याळें तयार होतील. पहिल्या वर्षी घड्याळाच्या किंमतीपैकी ५० टक्के किंमतीचे भाग परदेशांतून आयात केलेले असतील. पुढें दरसाल परदेशी भागांचें प्रमाण कमी कमी होत जाईल, व कारखान्यांत तयार होणारीं घड्याळें संपूर्णपणें देशी बनावटीचीं होतील.

### रेल्वे अर्थसंकल्प

( आंकडे कोटी रुपयांचे )

| | प्रत्यक्ष (१९५९-६०) | दुरुस्त अर्थ-संकल्प (१९६०-६१) | अर्थसंकल्पी आंकडे (१९६१-६२) |
|---|---|---|---|
| (१) वाहतुकीचें एकूण उत्पन्न | ४२२.३३ | ४५८.०० | ४९९.०२× |
| (२) सर्वसाधारण चालू खर्च | २८९.५२ | ३२६.३१ | ३३२.५३ |
| (३) निव्वळ किरकोळ खर्च | १३.१६ | १५.९१ | १४.८८ |
| (४) घसारा राखीव निधींत जमा | ४५.०० | ४५.०० | ६५.००+ |
| (५) इतर रेल्वेना (वर्क्ड लाइन्स) दिलेली रक्कम | ०.१० | ०.०९ | ०.१३ |
| वरील २ ते ५ ची बेरीज | ३४७.७८ | ३८७.३१ | ४१२.५४ |
| रेल्वेचें निव्वळ उत्पन्न | ७४.५५ | ७०.६९ | ८६.४८ |
| सर्वसाधारण महसुलांत जमा | ५४.४३ | ५६.६६ | ६५.३४* |
| उतारू कराच्या बदल्यांत राज्यांना द्यावयाची रक्कम | — | — | १२.५०++ |
| निव्वळ शिल्लक | २०.१२ | १४.०३ | ८.६४ |

× वरील आंकडा १–४–६१ पासून उतारू भाड्यांत उतारू-कर मिळविल्यानंतर येणाऱ्या रकमेचा आहे. + घसारा राखीव निधींत वाढीव दरानें टाकलेली रक्कम.

* १९६०–६१ पर्यंत ४ टक्के दरानें सर्वसाधारण महसुलांत लाभांश म्हणून टाकण्यांत येणारी रक्कम ६१–६२ मध्येंच सव्वाचार टक्के दरानें देण्यांत आली आहे.

++ वाहतुकीच्या उत्पन्नांतून राज्य सरकारांना द्यावयाच्या रकमेसाठी सर्वसाधारण महसुलांत टाकलेली रक्कम.

---

## Notification

" Under Rule No. 4 of the Regulations for the Award of the Government Diploma in Co-operation and Accountancy, candidates wishing to appear for the examination for the above Diploma have to fulfill a condition among others to have served in an institution or a Co-opertive Bank recognised by the Co-operation and Accountancy Diploma Board. Under powers vested in Rule No. 12 of the said Regulations, it is hereby notified that all the Co-operative institutions having working capital over Rs. 5 lakhs are recognised by the Government Diploma in Co-operation and Accountancy Board for purposes of enabling candidates serving under them to be eligible for appearing at the said examination.

Poona.
No. EST/313 of 61.
18–2–1961.

**L. N. BONGIRWAR**
Chairman, Govt. Diploma in Co-operation and Accountancy Board, Poona 1.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.